मंत्रालयीन सेवा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
४ था मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दुरध्वनी क्र. : ०२२-२२७९ ३८३७ Email ID : priyanka.chhapwale@nic.in

---

क्रमांक : एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दिनांक : २४ जून, २०२५.

**प्रति,**

**सर्व जिल्हाधिकारी**
**सर्व नगरपंचायतींचे मुख्याधिकारी**

**विषय:- राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकाबाबत.**

**संदर्भ:-** समक्रमांकाचे दि.१०.०६.२०२५ व दि.२३.०६.२०२५ रोजीचे आदेश व दि.१२.०६.२०२५ व दि.२३.०६.२०२५ रोजीची पत्रे.

**महोदय,**

राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूका प्रस्तावित असून, सदर निवडणूकांच्या अनुषंगाने प्रभाग रचनेसंदर्भातील सूचना दि.१०.०६.२०२५ अन्वये निर्गमित करण्यात आले होते. त्यानुषंगाने, प्रभाग रचनेसंदर्भातील कालबध्द कार्यक्रम दि.१२.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आला होता.

२. तद्नंतर, राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने प्रभाग रचनेसंदर्भातील आदेशामध्ये दि.२३.०६.२०२५ अन्वये शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले असून, त्यानुषंगाने, महानगरपालिका व नगरपरिषदांमधील प्रभाग रचनेसंदर्भातील सुधारित कालबध्द कार्यक्रम दि.२३.०६.२०२५ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे.

३. आता, राज्यातील नगरपंचायतींमधील प्रभाग रचनेसंदर्भातील सुधारित कालबध्द कार्यक्रम सोबत जोडण्यात येत आहे. सदर सुधारित कालबध्द कार्यक्रमामध्ये नमुद करण्यात आलेल्या कालावधीनुसार टप्पेनिहाय कार्यवाही पुर्ण होईल याची दक्षता संबंधित अधिकारी यांनी घ्यावी.

तसेच, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका विहीत कालावधीत घेण्याचे मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असल्याने, या कालबध्द कार्यक्रमामध्ये कोणत्याही प्रकारची सुट अथवा सवलत अनुज्ञेय असणार नाही.

**आपली,**

**सहपत्र:-** वरीलप्रमाणे.

**(प्रियांका कुलकर्णी-छापवाले)**
**शासनाच्या उप सचिव**

**प्रत :-**

१) सचिव, मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य.
२) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई.
३) निवडनस्ती (नवि-१४)

# "नगरपंचायतींच्या प्रभाग रचनेकरीता वेळापत्रक"

| अ. क्र. | | प्रभाग रचनेचा टप्पा | कार्यवाही करणारा अधिकारी | दिनांक (पासून-पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| १. | | प्रगणक गटाची मांडणी करणे. | संबंधित नगरपंचायत मुख्याधिकारी | ११ जून, २०२५ ते १६ जून, २०२५ |
| २. | | प्रारुप प्रभाग रचना तयार करणे | संबंधित नगरपंचायत मुख्याधिकारी | |
| | अ. | जनगणनेनची प्राप्त माहिती तपासणे. | | १७ जून ते १८ जून, २०२५ |
| | ब. | स्थळ पाहणी. | | १९ जून ते ०३ जुलै, २०२५ |
| | क. | गुगलमॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करणे. | | ०४ जुलै ते १० जुलै, २०२५ |
| | ड. | नकाशावर निश्चित केलेल्या प्रभागहद्दी जागेवर जावून तपासणे. | | ११ जुलै ते १७ जुलै, २०२५ |
| | ई. | प्रारुप प्रभाग रचनेचा मसुदा तयार करुन त्यावर समितीने स्वाक्षऱ्या करणे. | | १८ जूलै ते २९ जुलै, २०२५ |
| ३. | | प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगास पाठविणे. | जिल्हाधिकारी संबंधित नगरपंचायत मुख्याधिकाऱ्यांमार्फत | ३० जुलै, २०२५ ते ०६ ऑगस्ट, २०२५ |
| ४. | | मा.राज्य निवडणुक आयोग/ आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याने प्रारुप प्रभाग रचनेस मान्यता देणे. | | |
| ५. | | प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे व त्यावर हरकती सूचना मागविणे | संबंधित नगरपंचायत मुख्याधिकारी | १८ ऑगस्ट, २०२५ ते २१ ऑगष्ट, २०२५ |
| ६. | | जिल्हाधिकारी/ जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याने प्राप्त हरकती सूचनांवर सुनावणी घेणे. | जिल्हाधिकारी/ संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी | २२ ऑगष्ट, २०२५ ते ०८ सप्टेंबर, २०२५ |
| ७. | | सुनावणीनंतर हरकती व सूचनांवरील शिफ़ारशी विचारात घेऊन प्राधिकृत अधिकारी यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना नगर विकास विभागास सादर करणे. | जिल्हाधिकारी/ संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी संबंधित मुख्याधिकाऱ्यांमार्फत | ०९ सप्टेंबर, २०२५ ते १५ सप्टेंबर, २०२५ |
| ८. | | मा.राज्य निवडणूक आयुक्त यांनी अंतीम मान्यता दिलेली प्रभाग रचना संबंधित मुख्याधिकारी यांना कळविणे. | | |
| ९. | | मा.राज्य निवडणुक आयुक्त यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करणे. | संबंधित नगरपंचायत मुख्याधिकारी | २६ सप्टेंबर, २०२५ ते ३० सप्टेंबर, २०२५ |